



En 4 a
२-४-२८

नं. १९६
सन १९१५ चे फेब्रुवारी महिन्याचे
९ तारीखेस दिवसाचे ... ९ ...
वाजण्याचे दरम्यान हवेलीचे सबरजिस्ट्रारचे ऑफिसात
आणून दिला.

Vishwanath Balaji Gokhale

Ruda [signature]
जॉइंट सबरजिस्ट्रार हवेली नंबर २

... सिटिझनांकडून फी घेतली :-
रजिस्ट्रेशन फी ... रु. २
नकलेची फी (... ) रु. १-६-
१२
एकूण रु. ३-६-

Ruda [signature]
जॉइंट सबरजिस्ट्रार हवेली नंबर २

श्री

खरेदीखत जमिनीचें तारीख ९ माहे फेब्रुअरी सन १९१५ इसवी मिती माघ वद्य १० रोज मंगळवार शके १८३६ आनंद नाम संवत्सरे.

१ रावसाहेब विष्णु अनंत पटवर्धन राहणार पुणें पेठ नारायण, धंदा वकिली, जात ब्राह्मण उमर वर्षे ५५ ट्रस्टी श्री डेक्कन एज्युकेशन सोसायटी.
(२) श्रीमंत श्रीधरराव विठ्ठल ऊर्फ बाबा साहेब नातू राहणार पुणें पेठ शनवार धंदा इनाम्दारी जात ब्राम्हण उमर वर्षे ३२

} खरेदी घेणार

2

ट्रस्टी श्री डेक्कन एज्युकेशन सोसायटी

१ विश्वनाथ बाबाजी गोखले राहणार पुणें पेठ शनवार घ. नं. २५६ जात ब्राम्हण धंदा व्यापार उमर वर्षे २५

2 विष्णु बाबाजी गोखले राहणार पुणें पेठ शनवार घ. नं. २५६ जात ब्राम्हण धंदा विद्यार्थी उमर वर्षे 23

} खरेदी देणार

रक्कम रुपये २०००० वीस हजार. तुकडी पुणें पोट तुकडी तालुके हवेली सब रजिस्टर यांचे हद्दींतील शहर पुणें पेठ सदाशीव नवीपेठ येथील जमीन जिराईत बागाईत इनामी बाउगें यांत दोन बांधीव विहीरी एक चालु न एक पडकी याला सर्वे नंबर ९८ जमीन सात एकर चौतीस गुंठे पोट खराबा एक गुंठा मिळून सात एकर पस्तीस गुंठे आकार रुपये 22 बावीस यावर दरसाल

सरकार देणें चौथाई नजराणा मिळून जुडी रुपये सहा चौदा ६।।४ आणे व लोकल फंड ०।५ एक पांच आणे एकूण आठ रुपये तीन आणे ८।३. या जमिनीचे चोहों बाजूस विटा दगडांची जुनी आवाराची भिंत ती जागजागी पडलेली आहे व तिजवर निवडुंगाची वाडी आहे त्यासी चतुःसीमा भोगवट्यातील कागदोत लिहिल्या प्रमाणें

पूर्वेस— सदरहू वाड्याचे भिंती पलीकडे देवबा सुतार यांचें घर व लिंबाजी भास्कर यांची बखळ जागा

पश्चिमेस— वाड्याचे भिंती बाहेर ढोर यांची घरें व पली कडे सरकारी सडक

दक्षिणेस— वाड्याचे भिंती बाहेर बोळ पलीकडे तकडवाले यांचीं घरें

उत्तरेस— वाड्याचे भिंती बाहेर रस्ता पूर्व पश्चिम जात आहे

यांचे मिळकतीच्या हल्लीं पहातां चतुःसीमा.

पूर्वेस— वाड्याचे भिंती पलीकडे गणेश बळवंत लिमये यांचा लुगडीं काढण्याचा कारखाना; महादू बाळकृष्ण इगवे घ. नंबर १३ शंकर धोंडिबा इगवे घ. नंबर १२ सगाजी लक्ष्मण ...कवाड घ. नंबर १५ यांची बखळ शंकर धोंडी इगवे घ. नंबर ८. बाबाजी कुराबा पानसरे घ. नंबर ६; नारायण संभाजी कारंगोळ घ. नंबर ५; लक्ष्मण विठोबा पडवळ घ.

र नंबर ४ शिवनाथ नारायण मारवाडी

दक्षिणेस – वाड्याचे भिंती पलीकडे सरकारी बोळ पूर्वपश्चिम जात आहे नवीपेठ पोलीस गेटाकडे व त्या पलीकडे लक्कड वाले मोची वगैरे.

पश्चिमेस – वाड्याचे भिंती पलीकडे लक्ष्मण बिंदू चांभार नारायण पेठ घ. नंबर २०२; पुंडलिक रामजी चांभार नारायण पेठ घ. नंबर २०१; पेतांचे घर नं. १९८; गणपती महादू चांभार घ. नंबर १९८ पलीकडे सरकारी सडक नवीपेठ गेट कडून लक्कडी पुलाकडे जाणारी

उत्तरेस – भिंती बाहेर सरकारी रस्ता पूर्वपश्चिम स्मशानाकडे जात आहे त्या पलीकडे दशरथ देवजी मांग, हरी बेंदू मांग, बाबजी मांग; गजा मांग; तुकाराम मांग; हरी पवाजी मांग; नाना मांग; गजा मांग, नाना नागू मांग; भिमाजी नादू मांग; व नामदू मांग

येणें प्रमाणें चतुःसीमा पूर्वक मिळकत चौदिवाली भिंती सुद्धां जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण, निधिनिक्षेपादि सर्व तदंतर्भूत वस्तू सहित आम्ही तुम्हांस रक्कम रुपये बीस हजारांस खरेदी देऊन तुमचे कबजांत दिली आहे.

सदरहू मिळकत पूर्वी श्रीमंत पंतप्रतिनिधी यांनी सचिव पंत भाऊ दशपांडे प्रयाग टेंभुरणी उर्फ सदाशिव पंत माणकेश्वर यांस इनाम करून दीली असून त्यांचे पासून

खरेदी हक्काने गणेश नारायण अयाचीत योस मिळाली. तिज-
बद्दल इंग्रज सरकारांतून सदरहू राजश्री गणेश नारायण अयाचीत
योस सन १८५८ साली समरी सेटलमेंटची जात इनामाची सनद
र. नंबर १२६८ ची मिळाली आहे. सदरहू मिळकतीची पुणें फर्स्ट
क्लास सब जड्ज कोर्टातून सन १८७० साली जाहीर लिलांव हो-
ऊन सदरहू अयाचीत योचा या मिळकतींतील दाना हक्क सं-
बंध जाहीर लिलावांत बाबाजी मानाजी धाडगे योचे नावें
लिलांवपत्र होऊन पुढें त्यांचे कबजांत सदरहू मिळकत आ-
ली ती त्याने मालकी हक्कानें वापरून आमचे वडील कैलासवा-
सी बाबाजी नारायण योचेकडे गहाण टाकिली. सदर बाबाजी
मानाजी मयत झाल्यावर त्याचे वारसावर आमचे वडिलानीं
लवाद निवाडा नंबर ४३ तारीख २८ मार्च १८८७ रोजीं
मिळविला. या लवाद निवाड्यांतील शर्ती प्रमाणें त्यानीं वर्त-
न केल्यामुळें सदरठरावा बरहुकूम आमचे वडील या मिळ-
कतीचे पूर्ण मालक झाले. व जमीन आमचे वडिलांचे कबजां-
त आली, तेव्हां पासून आमचे वडील मालकी हक्कानें या जमी-
नीची खंडानें लावून वहिवाट करीत आले, व त्यांचे मागें
आम्ही आजपर्यंत मालकी हक्कानें सदरहू जमीन खंडानें लावून
वहिवाटीत आहोंत. ती मिळकत सर्व इनामी मिराशी हक्का-
सुद्धां तुम्हांस खरेदी देऊन तुमचे कबजांत दिली आहे.

हल्लीं पावेतों या जमिनींत मारुती गोपाळ अनारसे हा आमचे
तर्फे खंडकरी होता. त्याची खंडानें वहिवाटण्याची मुदत फाल्गुन
शके १८३८ पर्यंत संपते, करितां त्याची सोडचिठ्ठी घेऊन ती आ-

गवरयास देऊं.

— सदरहू जमिनीवरील सरकारदेणें जुडी नजराणा मिळून रकम रुपये ८०१४ सहा चौदा आणे व लोकलफंड रुपये १८५ एक पांच आणे. चालू साल पर्यंत आम्ही भरीत आलों त्या प्रमाणें व पुढें कमीजास्त झाल्यास त्या प्रमाणें तुम्ही पुढें साल दरसाल भरीत जाना व आपले नांवें पावती घेत जावी. सदरहू जमिनीचें खातें सरकार दप्तरीं मुलकी दप्तरीं आमचे वडिलांचे नांवें आहे तें तुमचे नांवें करून देऊं. व त्या संबंधीं कबुली जबाब वगैरे देणें झाल्यास तो आम्ही देऊं व इतर जें जें करणें लागेल तें तें करूं व त्या करितां आजच आम्ही आपले सहीचा मुलकी अधिकाऱ्याकडे अर्ज केला आहे.

— तुम्हांस खरेदी दिलेल्या जमिनीवर आमचा अगर आमचे वाली वारसाचा कोणीएक हक्क संबंध राहिला नाहीं. या पुढें तुम्हीं पूर्ण मालक झालां आहांत. या जमिनीची वहिवाट या पुढें धी डेक्कन एज्युकेशन सोसायटीनें मर्जीस येईल त्या प्रमाणें पूर्ण मालकी हक्कानें तुम्ही व तुमचे सक्सेसर्स व असाइन्स यांनीं परंपरेनें करावी. या मिळकतीच्या मालकी हक्क संबंधानें अगर कबजासंबंधानें कमीजास्त व हरकत आल्यास त्याचें आम्ही निवारण करूं. व या प्रमाणें आमचे कसुरी मुळे नुकसान होईल तें भरून देऊं. ही मिळकत आम्ही कोणासही गहाण, दान, बक्षीस, खरेदी वगैरे दिलेली नाहीं. अगर देण्याचा करार केलेला नाहीं. अगर इतर कोणतेही रीतीनें जड ओझ-

THE SEAL OF THE S

मोत घातलेली नाही: अशी निर्वेध इस्टेट तुम्हांस खरेदी दिली आहे.

सदरहू जमीन व तिचे आजूबाजूच्या जागेचा सिटी सर्व्हेचा नकाशा तुमचे भोगवट्यास देत. नकाशांत उत्तर बाजूस दाखविलेली गुणा व. गोपा मांग याची झोपडीची इमारत तुम्हांस खरेदी दिलेल्या जागेच्या हद्दीच्या भिंतीवर आलेली आहे. त्या बद्दल आमचे वडिलांनी गुणा मांग या पासून तारीख ८ जून १९६३ रोजी लेखी अलाहिदा करारनामा रजिस्टर करून घेतला आहे. तो करारनामा तुमचे भोगवट्यास दिला आहे. त्या करारांचे शर्ती प्रमाणे आपले हद्दीत आलेला सदरहू झोपडीचा भाग वगैरे त्या जेव्हेस काढून टाकण्यास तुम्हास पूर्ण अधिकार आहे.

सदरहू खरेदीखताच्या भरण्याचा तपशील खाली लिहिल्या प्रमाणे

१ ह्या जमिनी बद्दल तुम्हास आम्ही तारीख २० जानेवारी १९५८ रोजी साठे खत लिहून दिले त्या दिवशी रजिस्टर समोर तुम्हापासून आम्हीं रोख रुपये ५००० पांच हजार घेतले ते. सदर साठे खत हवेली सब रजिस्टर हपिसांत १ले नंबरचे बुक पैकी चे १००१ व्हॉल्युममध्ये ३१ ते ३४ पृष्ठांत १०५८ नंबरी ता. २३ जानेवारी १९५८ रोजी नोंदले आहे.

१ ह्या खेरीज आज रजिस्टर समोर रोख रुपये ५००० पांच हजार घेतले ते.

१ बाकी राहिलेले दहा हजार रुपये हप्त्याने आजपासून दरसाल दरशेकडा ४ रुपये व्याजाने आम्हीं द्यावयाचे

ठरले ते हप्ते येणें प्रमाणें प्रत्येक हप्ता राहिलेल्या सर्व रकमेचे व्याज सुद्धां

- १००० जानेवारी सन १९१६ अखेर.
- १००० जानेवारी सन १९१७ अखेर.
- २००० जानेवारी सन १९१८ अखेर.
- २००० जानेवारी सन १९१९ अखेर.
- २००० जानेवारी सन १९२० अखेर.
- २००० जानेवारी सन १९२१ अखेर.

१००००

वर लिहिल्याप्रमाणें भरणा पावला भरण्याबद्दल तक्रार राहिली नाहीं. सदरच्या रकमेपैकीं जी दहा हजाराची रक्कम हप्त्यानीं पुढील सहा वर्षांत देण्याचें ठरलें आहे ती आमचे पदरीं व्याज सुद्धा सर्व पुरे पर्यंत येणें राहिलेल्या रकमेचा बोजा या जमिनीवर राहील

सदरहू जमिनीचे संबंधी भोगवट्याचे सर्व कागद-आमच्या सहीच्या अलाहिदा यादी प्रमाणें तुमचे हवाली केले आहेत.

हें खरेदीखत आम्ही आपले राजीखुषीनें व अक्कल-हुषारीनें लिहून दिलें तारीख मजकूर दस्तूर महादेव विष्णु साने राहणार पुणें पेठ नारायण.

Vishwanath Balaji Gokhale

Vishnu Balaji Gokhale

साक्ष

१ [illegible]

१ [illegible]

मोत घातलेली नाही. अशी निर्वेद इस्टेट तुम्हांस खरेदी दिली आहे.

सदरहू जमीन व तिचे आजूबाजूच्या जागेचा सिटी सर्व्हेचा नकाशा तुमचे भोगवट्यास देऊं. नकाशांत उत्तर बाजूस दाखविलेली गुणा व. गोपा मांग याची झोपडीची इमारत तुम्हांस खरेदी दिलेल्या जागेच्या हद्दीच्या भिंतीवर आलेली आहे. या बद्दल आमचे वडिलांनीं गुणा मांग या पासून तारीख ८ जून १९५३ रोजी लेखी अलाहिदा करारनामा रजिस्टर करून घेतला आहे. तो करारनामा तुमचे भोगवट्यास दिला आहे. त्या कराराचे शर्ती प्रमाणे आपले हद्दींत आलेला सदरहू झोपडीचा भाग वगैरे त्या वेळेस काढून टाकण्याचा तुम्हास पूर्ण अधिकार आहे.

सदरहू खरेदीखताच्या भरण्याचा तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें

१ ह्या जमिनी बद्दल तुम्हास आम्ही तारीख २० जानेवारी १९५८ रोजी साठे खत लिहून दिलें त्या दिवशीं रजिस्टर समोर तुम्हांपासून आम्हीं रोख रुपये ५००० पांच हजार घेतले ते. सदर साठे खत हवेली सब रजिस्टर ऑफिसांत १ले नंबरचे बुक [illegible] १००१ व्हॉल्यूममध्ये ३१ ते ३४ पानांत १७५८ नंबरी ता० २३ जानेवारी १९५८ रोजी नोंदलेले आहे.

१ वरील शिवाय आज रजिस्टर समोर रोख रुपये ५००० पांच हजार घेतले ते.

१ बाकी राहिलेले दहा हजार रुपये हप्त्याने आज पासून दरसाल दरशेंकडा ४ रुपये व्याजाने आम्हीं द्यावयाचे

SUB-REGISTRAR OF

विश्वनाथ बाळाजी गोखले दस्तऐवज करून देणार आपण


ब्राह्मण, २८, पुणे पेठ शनवार घर नंबर २२६ दस्तऐवज करून

दिल्याचे कबूल करतात यास लिहून घेणार तर्फे विनायक

हरी सोमण रा. पुणे पेठ नारायण यांनी नोटी रुपये (३०००) व्या

नगदी रुपये (२०००) एकूण रुपये (५०००) पांच हजार सब

राजिस्ट्रार समोर दिले आहेत




Vishwanath Balaji Gokhale

विष्णु बाळाजी गोखले दस्तऐवज करून देणार, विद्यार्थी

ब्राह्मण, २३, पुणे पेठ शनवार घर नंबर २२६ दस्तऐवज करून

दिल्याचे व विश्वनाथ बाळाजी यास दिलेला ऐवज पाव

ल्याचे कबूल करतात



Vishnu Balaji Gokhale

रामचंद्र नारायण बर्वे पेन्शनर राहणार पुणे पेठ शुक्रवार घर
नंबर ४८ यांनी साक्षवरील लिहून देणारांचे ओळखीविषयी
घेतली साक्षी दारास सब रजिस्ट्रार ओळखतात

रामचंद्र नारायण बर्वे

तारीख ६ माहे फेब्रुआरीसन १९५२

Ruedaf Hanle
जो. सबरजिस्ट्रार नं. २

पुस्तक १ ... नंबराचे बुकाचे २२२ ...
पानांचे ३१ ते ३२ पर्यंतचा
... नंबरी नोंदला.
३६०८ अ

[illegible signature]

जॉ. सब रजिस्ट्रार, हवेली १

तारीख १३ फेब्रुवारी १९७५

THE SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR OF HAVELI (1)
हवेलीचे जॉइंट सब-रजिस्ट्रार यांचा शिक्का (१).

[illegible signature]

[redacted]

[redacted]